दै० नवराष्ट्र दि० ०३/०१/२०२५

# आचारसंहिता पथकाकडून लाखोंची रोकड जप्त

## भिवंडीत ४ लाख ४० हजारांची रक्कम जप्त

भिवंडी (वा.) भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान सुरू आदर्श आचारसंहिता कालावधीत भरारी पथकाने साईबाबा तपासणी नाका परिसरात एक जानेवारी रोजी सायंकाळी ५.४५ वाजताच्या सुमारास एका वाहनातून ४ लाख ४० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. आचार संहिता पथक प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके,तसेच सहायक पथक प्रमुख समीर जवरे यांचे नियंत्रणाखाली भरारी पथक क्रमांक एक चे अधिकारी दीपक हनुमान नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे.



साईबाबा नाका येथे तपासणीदरम्यान चारचाकी वाहन क्रमांक एम एच.०५.ई व्ही.६६६७ या वाहनाची तपासणी करीत असताना वाहनात ४ लाख ४० हजारांची रोख रक्कम आढळून आली.

### जागीच केला पंचनामा

वाहन चालक नरेंद्रसिंग मधुकर देवरे यांच्याकडे सदरची रक्कम कुठून आणली व कुठे चालवली व काय कामासाठी रक्कम घेतली आहे याबाबतची कागदपत्रांची मागणी केली असता सदरील वाहन चालकांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे भरारी पथकाच्या निदर्शनास आणून दिली नाही. त्यामुळे पथकाने मोजणी व पंचनामा करून रोख रक्कम ४ लाख ४० हजार रुपये पकडल्याबाबत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे नोंद करून सदरची रक्कम मनपाचे लेखा विभागात जमा करण्यात आली आहे.

दै० पुण्यनगरी दि० ०३/०१/२०२५

# भिवंडीत पथकाकडून ४ लाख ४० हजार जप्त



भिवंडी : पालिकेच्या निवडणुकीत मतदारांना विविध प्रकारचे प्रलोभन त्याचबरोबर छुप्या मार्गाने अर्थकारण सुरू झाल्याने महापालिकेचे आचारसंहिता पथक सतर्क झाले आहे. आदर्श आचारसंहिता भरारी पथकाने कल्याण रोडवरील साईबाबा चेकपोस्ट येथे वाहन तपासणी मोहिमेत एका वाहनातून ४ लाख ४० हजार रुपयांची रोकड जप्त करून ही रक्कम महापालिकेच्या लेखा विभागात जमा केल्याची माहिती पालिका आयुक्त प्रशासनाकडून देण्यात आली.

शहरातील विविध ठिकाणी मुख्य प्रवेशद्वारावर येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची पोलीस व आचारसंहिता पथकाचे अधिकारी तपासणी करत आहेत. असे असताना भिवंडी कल्याण रोडवरील साईबाबा चेकपोस्ट येथे गुरूवारी सायंकाळीआचारसंहिता पथकाचे प्रमुख तथा मनपाचे अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, तसेच सहायक पथक प्रमुख समीर जवरे यांचे नियंत्रणाखाली भरारी पथक क्रमांक एकचे अधिकारी दीपक हनुमान नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी वाहन तपासणी दरम्यान चारचाकी वाहनातून चार लाख ४० हजार रुपये जप्त केले. वाहन चालक नरेंद्रसिंग मधुकर देवरे यांच्याकडे ही रक्कम कुठून आणली व काय कामासाठी रक्कम घेतली आहे. याबाबतची चौकशी करून संबंधित कागदपत्रांची मागणी केली असता वाहन चालकाने कोणत्याही प्रकारची कागदपत्रे एफएसटी पथकास दाखवू शकले नाहीत. त्यामुळे पथक प्रमुख यांनी पैशाची मोजणी करून त्याबाबत पंचनामा करून याची नोंद शांतीनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली.

दै० लक्ष्य भारत दि० ०३/०१/२०२५

# भिवंडीत निवडणूक पथकाने चार लाख रक्कम केली जप्त

ठाणे, दि. २ : प्रतिनिधी

भिवंडी–निजामपूर शहर महानगरपालिका निवडणूक आदर्श आचारसंहिता लागू असण्याच्या कालावधीत भरारी पथकाने साईबाबा चेकपोस्ट परिसरात आचारसंहिता पथकप्रमुख, अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, सहायक पथक प्रमुख समीर जवरे यांच्या नियंत्रणाखाली शुक्रवार, दि. १ जानेवारी रोजी चारचाकी वाहन मारुती इर्टीगा क्रमांक एमएच ०५–ईवी – ६६६७ या वाहनातून रु. चार लाख, ४० हजार इतकी रोख रक्कम जप्त केली. त्याबाबत वाहनचालक नरेंद्रसिंह मधुकर देवरे यांच्याकडे ही रक्कम कुठून आली व कुठे दिली जाणार होती, कोणत्या कामासाठी रक्कम घेतली आहे याबाबतची कागदपत्रांची मागणी केली असता या वाहनचालकाने कोणतीही दिली नाहीत. या रक्कमेची मोजणी करून त्याबाबत पंचनामा करण्यात आला. याविषयीची नोंद शांतिनगर पोलीस स्थानकात करून ही रक्कम मनपाच्या लेखा विभागात जमा करण्यात आली आहे.

यावेळी प्रभाग समिती २ चे अधिकारी माणिक जाधव, बिट निरीक्षक धनराज पाटील, आकाश भोईर यांसह निखील साळवे, मनोज गुज्ञा, मुस्तकीम शेख, समीर जमादार हे पोलीस उपस्थित होते.

दै० महाराष्ट्र टाइम्स दि० ०३/०१/२०२५

# दहा दिवसांत दुसऱ्यांदा भिवंडीतून रोकड जप्त

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

गेल्या दहा दिवसांत दुसऱ्यांदा आचारसंहिता पथकाने भिवंडीतून एका कारमधून ४ लाख ४० हजारांची रोकड जप्त केली. याबाबत शांतीनगर पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून ही रक्कम भिवंडी-निजामपूर महापालिकेच्या लेखा विभागात जमा करण्यात आली आहे.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागू असून महापालिकांची सर्व आचारसंहिता पथके संध्या सतर्क झाली आहेत. गुरुवारी सायंकाळी भरारी पथकाने भिवंडीतील साईबाब चेकपोस्ट परिसरात वाहनांची तपासणी करण्यात येत होती. त्यावेळी पथकाने एका कारमधून चार लाख ४० हजारांची रोकड जप्त केली. ही रक्कम कुठून आणली, कुठे आणि कोणत्या कामासाठी नेण्यात येत आहे, याविषयी पथकातील अधिकाऱ्यांनी चालकाकडे चौकशी केली. परंतु, चालकाने या पैशांविषयी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत. त्यामुळे ही रक्कम जप्त करण्यात आल्याची माहिती भिवंडी पालिका प्रशासनाने दिली. यापूर्वी २३ डिसेंबर रोजी आचारसंहिता पथकाने भिवंडीतून ८ लाख २८ हजार ९०० रुपयांची रोकड जप्त केली होती. अशाप्रकारे मागील दहा दिवसांत १२ लाख ६८ हजार ९०० रुपयांची रोकड जप्त केली आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० नवशक्ती दि० ०३/०१/२०२६

# भिवंडीत ४ लाख ४० हजार रुपयांची रक्कम जप्त

भिवंडी : भिवंडी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत भरारी पथकाने मोठी कारवाई करत ४ लाख ४० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. ही कारवाई १ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ५.४५ वाजता साईबाबा तपासणी नाका परिसरात करण्यात आली.

आचारसंहिता पथक प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके आणि सहायक पथक प्रमुख समीर जवरे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथक क्रमांक १ चे अधिकारी दीपक हनुमान नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली.



साईबाबा नाका येथे तपासणी सुरू असताना चारचाकी वाहनाची तपासणी करण्यात आली. या वाहनात ४ लाख ४० हजार रुपयांची रोख रक्कम आढळून आली. वाहन चालक नरेंद्रसिंग मधुकर देवरे यांच्याकडे सदर रक्कम कुठून आणली, कुठे नेण्यात येत होती व कोणत्या कामासाठी नेली जात होती, याबाबतची कागदपत्रे सादर करण्यास सांगितले असता ते कोणतीही वैध कागदपत्रे सादर करू शकले नाहीत.

दै० पुढारी दि० ०३/०१/२०२६

# भिवंडीत आचारसंहिता पथकाकडून ४ लाख जप्त

**भिवंडी : पुढारी वृत्तसेवा**

भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान सुरू आदर्श आचारसंहिता कालावधीत भरारी पथकाने साईबाबा तपासणी नाका परिसरात १ जानेवारी रोजी सायंकाळी ५.४५ वाजताच्या सुमारास एका वाहनातून ४ लाख ४० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे.

आचार संहिता पथक प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, तसेच सहाय्यक पथक प्रमुख समीर जवरे यांचे नियंत्रणाखाली भरारी पथक क्रमांक १ चे अधिकारी दीपक हनुमान नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे.

साईबाबा नाका या ठिकाणी तपासणीदरम्यान चारचाकी वाहनाची तपासणी करीत असताना वाहनात ४ लाख ४० हजारांची रोख रक्कम आढळून आली. वाहन चालक नरेंद्रसिंग यांच्याकडे सदरची रक्कम कुठून आणली व कुठे चालवली व कोणत्या कामासाठी रक्कम घेतली, याबाबतची कागदपत्रांची मागणी केली असता सदरील वाहन चालकांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे भरारी पथकाच्या निदर्शनास आणून दिली नाही. त्यामुळे पथकाने मोजणी व पंचनामा करून रोख रक्कम ४ लाख ४० हजार रुपये पकडल्याबाबत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे नोंद करून सदरची रक्कम मनपाचे लेखा विभागात जमा करण्यात आली आहे.

दै० लोकमत दि० ०३/०१/२०२६

# आचारसंहिता पथकाकडून ४ लाख ४० हजार जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**भिवंडी :** आदर्श आचारसंहिता कालावधीत भरारी पथकाने गुरुवारी सायंकाळी शहरातील साईबाबा चेकपोस्ट येथे एका कारमधून ४ लाख ४० हजारांची रक्कम जप्त केली.

या रकमेबाबत कारचे चालक नरेंद्रसिंग मधुकर देवरे यांच्याकडे विचारणा केली असता चालकाने कोणत्याही प्रकारची कागदपत्रे भरारी पथकाकडे सादर केली नाहीत. त्यामुळे पथकाने पंचनामा करून ४ लाख ४० हजारांची रक्कम जप्त करत शांतीनगर पोलिस ठाण्यात नोंद करून रक्कम मनपाच्या लेखा विभागात जमा केल्याची माहिती मनपा निवडणूक विभागाकडून देण्यात आली. यासंर्भात चौकशी सुरू असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.

Scanned with OKEN Scanner

दै० दैनिक भास्कर दि० 03/01/2026

# भिवंडी में चुनाव आचार संहिता पथक ने कार से 4.40 लाख नगद किए जब्त

भास्कर संवाददाता | भिवंडी

आचार संहिता के दौरान प्रशासन की सतर्कता लगातार जारी है। इसी क्रम में उड़न दस्ता (फ्लाइंग स्क्वॉड) टीम ने एक कार से 4 लाख 40 हजार रुपए की नकद राशि जब्त की है। यह कार्रवाई 1 जनवरी, 2026 को शाम करीब 5.45 बजे साई बाबा चेकपोस्ट परिसर में की गई है।

अतिरिक्त आयुक्त एवं आचार संहिता पथक प्रमुख विठ्ठल डाके तथा सहायक पथक प्रमुख समीर जवरे के मार्गदर्शन में उड़नदस्ता पथक क्रमांक-1 के अधिकारी दीपक हनुमान नाईक एवं उनकी टीम ने जांच के दौरान एक कार को रोका। जांच के दौरान वाहन से कुल 4,40,000 रुपए की नकद राशि बरामद हुई। वाहन चालक की पहचान नरेंद्रसिंह मधुकर देवरे के रूप में हुई। जब उनसे नकदी के स्रोत, उपयोग और गंतव्य से संबंधित दस्तावेज मांगे गए, तो वे कोई वैध कागजात प्रस्तुत नहीं कर सके। इसके बाद उड़नदस्ता ने शांति नगर पुलिस स्टेशन में शिकायत दर्ज कराई। बाद में यह राशि मनपा के लेखा विभाग में जमा कर दी गई।



दै० हमारा महानगर दि० 03/01/2026

# आचार संहिता पथक ने 4.40 लाख रुपए किया जब्त



**भिवंडी।** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका की सार्वत्रिक चुनाव प्रक्रिया 2025-26 के तहत लागू आदर्श आचार संहिता के दौरान प्रशासन की सतर्कता लगातार जारी है। इसी क्रम में उड़नदस्ता (फ्लाइंग स्क्वॉड) टीम ने बड़ी कार्रवाई करते हुए 4 लाख 40 हजार रुपए की नकद राशि जब्त की है। यह कार्रवाई 1 जनवरी 2026 को शाम करीब 5.45 बजे साईबाबा चेकपोस्ट परिसर में की गई। अतिरिक्त आयुक्त एवं आचार संहिता पथक प्रमुख विठ्ठल डाके तथा सहायक पथक प्रमुख समीर जवरे के मार्गदर्शन में उड़नदस्ता पथक क्रमांक-1 के अधिकारी दीपक हनुमान नाईक एवं उनकी टीम ने जांच के दौरान मारुति अर्टिगा कार (MH-05-EV-6667) को रोका। जांच के दौरान वाहन से कुल 4,40,000 रुपये की नकद राशि बरामद हुई। वाहन चालक की पहचान नरेंद्रसिंह मधुकर देवरे के रूप में हुई। जब उनसे नकदी के स्रोत, उपयोग और गंतव्य से संबंधित दस्तावेज मांगे गए, तो वे कोई वैध कागजात प्रस्तुत नहीं कर सके। इसके बाद उड़नदस्ता और वीडियो सर्विलांस टीम के अधिकारियों ने मौके पर नकदी की गिनती कर पंचनामा तैयार किया। जब्त की गई राशि के संबंध में शांतिनगर पुलिस स्टेशन में विधिवत प्रविष्टि दर्ज कराई गई और बाद में यह राशि महानगरपालिका के लेखा विभाग में जमा कर दी गई।

Scanned with OKEN Scanner

दै. आपलं महानगर दि. 03/01/2025

# भिवंडीत आचारसंहिता पथकाकडून ४ लाख ४० हजारांची रक्कम जप्त



**आपलं महानगर वृत्तसेवा**

**वार्ताहर। भिवंडी।** भिवंडी महापालिका सार्वत्रिक निवडणुकी दरम्यान सुरू आदर्श आचारसंहिता कालावधीत भरारी पथकाने साईबाबा तपासणी नाका परिसरात एक जानेवारी रोजी सायंकाळी ५.४५ वाजता च्या सुमारास एका वाहनातून ४ लाख ४० हजार रुपयांची रोख रक्कम जप्त केली आहे. आचार संहिता पथक प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके,तसेच सहायक पथक प्रमुख समीर जवरे यांचे नियंत्रणाखाली भरारी पथक क्रमांक.१ चे अधिकारी दीपक हनुमान नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे.

साईबाबा नाका येथे तपासणी दरम्यान चारचाकी वाहनाची तपासणी करीत असताना वाहनात ४ लाख ४० हजारांची रोख रक्कम आढळून आली. वाहन चालक नरेंद्रसिंग मधुकर देवरे यांच्याकडे ही रक्कम कुठून आणली व कुठे चालवली, काय कामासाठी रक्कम घेतली आहे? याबाबतची कागदपत्रांची मागणी केली असता वाहन चालकांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे भरारी पथकाच्या निदर्शनास आणून दिली नाही. त्यामुळे पथकाने मोजणी व पंचनामा करून रोख रक्कम ४ लाख ४० हजार रुपये पकडल्याबाबत शांतीनगर पोलीस स्टेशन येथे नोंद करून सदरची रक्कम मनपाचे लेखा विभागात जमा करण्यात आली आहे.

दै. सामना दि. 03/01/2025

## चार लाखांची रोकड जप्त



**भिवंडी :** भरारी पथकाकडून साईबाबा चौकात नाकाबंदीदरम्यान एका कारमधून ४ लाख ४० हजारांची रोकड जप्त केली आहे. भरारी पथक क्रमांक एकचे अधिकारी दीपक नाईक यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने ही कारवाई केली. कारवाईदरम्यान वाहनचालक नरेंद्रसिंग देवरे यांच्याकडे रक्कम कुठून आणली आणि कशासाठी आणली याची माहिती नसल्याने पथकाने ही रोकड ताब्यात घेतली. या घटनेची शांतीनगर पोलीस ठाण्यात नोंदणी करून जप्त केलेली रक्कम महापालिकेच्या लेखा विभागात जमा करण्यात आली आहे.

## बविआचा उमेदवार बचावला

**उल्हासनगर :** उल्हासनगर येथील सुभाष टेकडी चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याच्या संरक्षण कठड्याची काच कोसळल्याची घटना घडली. यावेळी बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी आलेले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार थोडक्यात बचावले. या घटनेनंतर पुतळ्याचे व संपूर्ण बांधकामाचे स्ट्रक्चर ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

दै. ठाणे वैभव दि. 03/01/2025

# भिवंडीत वाहन तपासणीत चार लाखांची रक्कम जप्त



**भिवंडी:** महानगर पालिकेच्या निवडणूक आदर्श आचारसंहिता भरारी पथकाने कल्याण रोडवरील साईबाबा चेकपोस्ट येथे वाहन तपासणी मोहीमेत एका वाहनातून सुमारे चार लाख 40 हजार रुपयांची रोकड रक्कम जप्त केली आहे.

शहरात आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने ती भंग होऊ नये यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. शहरातील विविध ठिकाणी मुख्य प्रवेशद्वारावर येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची पोलीस व आचारसंहिता पथकाचे अधिकारी तपासणी करत आहेत. दरम्यान साईबाबा चेकपोस्ट येथे काल सायंकाळी आचारसंहिता पथकाचे भरारी पथक क्रमांक एकचे अधिकारी दीपक नाईक व त्यांच्या सहकाऱ्यांनी वाहन तपासणी दरम्यान चारचाकी वाहन मारुती इर्टींगा (क्रमांक MH-05-EV-666) या वाहनातून चार लाख 40 हजार रुपये रोख रक्कम जप्त केली.

वाहन चालक नरेंद्रसिंग देवरे यांच्याकडे ही रक्कम कुठून आली आणि ही रक्कम कुठे नेण्यात येत होती, याबाबतची चौकशी करण्यात आली. संबंधित कागदपत्रांची मागणी केली असता वाहन चालक कोणत्याही प्रकारची कागदपत्रे एफएसटी पथकास दाखवू शकले नाहीत. त्यामुळे पथक प्रमुखांनी ही रक्कम पंचनामा करून ताब्यात घेतली. या प्रकरणी शांतीनगर पोलीस स्टेशन येथे नोंद करुन सदरची रक्कम महापालिकेच्या लेखा विभागात जमा करण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

Scanned with OKEN Scanner

दै० खबरें आज तक दि० 03/01/2026

# भिवंडी में आचार संहिता टीम द्वारा रु. ४.४० लाख की नकद राशि जब्त



**भिवंडी :** भिवंडी निजामपुर शहर मनपा के सार्वत्रिक चुनाव 2025-26 के तहत लागू आदर्श आचार संहिता के उड़नदस्ता टीम द्वारा की गयी कार्रवाई में 4 लाख 40 हजार रूपये जब्त की गई है।

बतादें कि साईबाबा चेकपोस्ट परिसर में आचार संहिता टीम प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके एवं सहायक टीम प्रमुख समीर जवरे के नेतृत्व में उड़नदस्ता टीम क्रमांक-1 के अधिकारी दीपक हनुमान नाईक एवं उनके सहयोगियों ने दिनांक 01 जनवरी 2026 को शाम 5.45 बजे के आसपास जांच के दौरान एक चारपहिया वाहन मारुति अर्टिगा (क्रमांक MH-05-EV-6667) से रु. 4,40,000/- की नकद राशि जब्त की। जांच के दौरान वाहन चालक नरेंद्रसिंह मधुकर देवरे से उक्त राशि के स्रोत, गंतव्य तथा उपयोग के संबंध में वैध दस्तावेज प्रस्तुत करने को कहा गया, लेकिन चालक द्वारा कोई भी संतोषजनक कागजात प्रस्तुत नहीं किए गए। फ्लाइंग स्क्वाड टीम प्रमुख एवं वीएसटी टीम प्रमुख द्वारा नकद राशि की गणना कर पंचनामा तैयार किया गया और रु. 4,40,000/- की नकद राशि जब्त की गई। इस संबंध में शांतिनगर पुलिस स्टेशन में मामला दर्ज कर उक्त राशि को महानगरपालिका के लेखा विभाग में जमा कराया गया है।

इस कार्रवाई के दौरान माणिक जाधव (प्रभाग अधिकारी, प्रभाग समिति क्र. 2), धनराज पाटिल (बीट निरीक्षक, प्रभाग समिति क्र. 2), आकाश भोईर (बीट निरीक्षक), निखिल सालवे, मनोज गुज्जा, मुस्तकीम शेख, समीर जमादार तथा पुलिसकर्मी उपस्थित थे।

Scanned with OKEN Scanner

दै. प्रहार दि. ०३/०१/२०२६

# भिवंडीत भाजपचे ६ उमेदवार बिनविरोध

## उबाठा-मनसे युती फिस्कटली; अर्ज माघारीच्या दिवशी काटाकाटी

◆ भिवंडी (वार्ताहर) :



राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी राजकीय घडामोडींना वेग आला. अनेक ठिकाणी उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे काही उमेदवार बिनविरोध निवडून आले असून, त्यात भाजप-महायुतीचे उमेदवार सर्वाधिक आहेत. एकट्या भाजपचे राज्यभरात ३५ पेक्षा अधिक उमेदवार बिनविरोध झाले. भिवंडी महानगरपालिकेत भाजपचे सहा उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

भिवंडीत भाजपकडून बिनविरोध विजयी ठरलेल्या उमेदवारांमध्ये वार्ड क्रमांक १६-अ मधील परेश चौगुले (आमदार महेश चौगुले यांचे चुलत भाऊ), १८-ब मधील दीपा मढवी, १८-क मधील अबू साद लल्लन, १८-अ मधील अश्विनी फुटाणकर आणि २३-ब मधील भारती हनुमान चौधरी यांचा समावेश आहे. याआधीच वार्ड क्रमांक १७ मधून केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पाटील बिनविरोध निवडून आले होते. त्यामुळे भिवंडीत भाजपच्या बिनविरोध उमेदवारांची संख्या सहावर पोहोचली आहे. या यशामुळे भिवंडी महापालिकेत भाजपचे स्थान अधिक मजबूत झाल्याचे चित्र आहे. दरम्यान, भिवंडी महापालिका निवडणुकीत उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती फिस्कटल्याचे स्पष्ट झाले आहे. मनसेसाठी ठरवण्यात आलेल्या दहा जागांपैकी चार प्रभागांमध्ये उबाठाने थेट उमेदवारी अर्ज दाखल केल्याने दोन्ही पक्षांमध्ये तणाव निर्माण झाला होता. वार्ड क्रमांक ६-अ, १३-अ, ११-ड आणि १७-ड मध्ये उबाठाने उमेदवार उभे केल्यामुळे मनसेत तीव्र नाराजी पसरली.

अर्ज माघारीच्या टप्प्यावर दोन्ही पक्षांमध्ये चर्चा झाली, मात्र कोणताही तोडगा न निघाल्याने मनसेने आपल्या दहा पैकी आठ उमेदवारांचे अर्ज मागे घेतले. युतीधर्म पाळला गेला नसल्याचा आरोप मनसेकडून करण्यात येत असून, या घडामोडींमुळे स्थानिक पातळीवर मनसे कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. पुढील भूमिका वरिष्ठ पातळीवर स्पष्ट होणार असली तरी, भिवंडीत अर्ज माघारीच्या दिवशी राजकारण चांगलेच तापल्याचे दिसून आले.

दै. पुढारी दि. ०३/०१/२०२६

# भिवंडीत इतिहासात प्रथमच सहा सदस्य बिनविरोध

## भाजपची विजयी घोडदौड; आमदार महेश चौघुलेंची शिष्टाई

भिवंडी : पुढारी वृत्तसेवा

भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या इतिहासात प्रथमच सहा सदस्य बिनविरोध निवडून येण्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे हे सहा ही विजयी उमेदवार हे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार असल्याने भिवंडीत भाजपाची विजयी घौडदौड सुरू झाली आहे. ज्यामध्ये एका अल्पसंख्याक मुस्लिम उमेदवाराचा समावेश आहे.

भिवंडी पालिकेत अर्ज माघारी घेण्याच्या पहिल्या दिवशी पद्मानगर येथील प्रभाग क्रमांक १७ मधून माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पुरुषोत्तम पाटील हे विजयी झाले.पण आज शेवटच्या दुसऱ्या दिवशी भिवंडीत आमदार महेश चौघुले यांच्या करिष्म्याने तब्बल पाच जणांनी बिनविरोध विजय पटकावला. प्रभाग क्रमांक १८ अ - अश्विनी सन्नी फुटाणकर,प्रभाग क्रमांक १८ ब - दीपा दीपक मढवी,प्रभाग क्रमांक १८ क - अबूसूद अशफाक अहमद शेख,प्रभाग क्रमांक १६ अ - परेश (राजू) चौघुले,प्रभाग क्रमांक २३ ब - भारती हनुमान चौधरी हे बिनविरोध विजयी झाले. हा विजय भाजपाच्या विकासाच्या कार्याचा विजय असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील जनतेला विकास भाजपा पक्षाच्या नेतृत्वाखालीच होऊ शकतो हा विश्वास देण्यात आम्ही यशस्वी झाल्याने मुस्लिम बाहुल्य प्रभाग क्रमांक १८ मध्ये आम्ही तीन उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यात यशस्वी झालो आहोत, अशी प्रतिक्रिया आमदार महेश चौघुले यांनी दिली. शहरातील अल्पसंख्यांक समाज सुद्धा राष्ट्रीय एकात्मता जोपासत एकत्र काम करीत आहेत, असे ते म्हणाले.



### ताडाळी परिसरातून भारती चौधरी बिनविरोध

ताडळी परिसरातील प्रतिष्ठेच्या प्रभाग क्रमांक २३ मधून भारतीय जनता पक्षाच्या भारतीय हनुमान चौधरी या बिनविरोध विजय झाल्या आहेत. ताडळी येथील प्रभाग क्रमांक २३ चे नेतृत्व करणारे ज्येष्ठ माजी नगरसेवक निलेश चौधरी यांनी केलेल्या शिष्टाईनंतर प्रभाग क्रमांक २३ ब मधील सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. आणि त्यानंतर हा विजय शक्य झाला आहे, अशी प्रतिक्रिया माजी नगरसेवक हनुमान चौधरी यांनी दिली आहे. यासोबत माजी नगरसेवक नारायण चौधरी, माजी महापौर तुषार चौधरी यांनी मोलाचे सहकार्य केल्याची प्रतिक्रिया हनुमान चौधरी यांनी दिली.

दै. लोकमत दि. ०३/०१/२०२६

### बिनविरोध निवडून आलेले नगरसेवक असे

| महापालिका | भाजप | शिंदेसेना | राष्ट्रवादी (अजित पवार) | इस्लामिक पार्टी | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|
| पुणे | २ | ० | ० | ० | ० |
| पिंपरी चिंचवड | २ | ० | ० | ० | ० |
| पनवेल | ६ | ० | ० | ० | १ |
| ठाणे | ० | ७ | ० | ० | ० |
| भिवंडी | ६ | ० | ० | ० | ० |
| कल्याण-डोंबिवली | १४ | ६ | ० | ० | ० |
| धुळे | ४ | ० | ० | ० | ० |
| मालेगाव | ० | ० | ० | १ | ० |
| जळगाव | ६ | ६ | ० | ० | ० |
| अहिल्यानगर | ३ | ० | २ | ० | ० |
| **एकूण** | **४३** | **१९** | **२** | **१** | **१** |

Scanned with OKEN Scanner

दै० लोकमत दि० ०३/०१/२०२६

# भिवंडी महापालिकेमध्ये भाजपचे पाच उमेदवार आले बिनविरोध

लोकमत न्यूज नेटवर्क

**भिवंडी :** अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपचे पाच उमेदवार बिनविरोध निवडून आले. तर गुरुवारी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचा पुतण्या सुमित पाटील हे प्रभाग १७ मधून बिनविरोध निवडून आल्याने भाजपच्या बिनविरोध उमेदवारांची संख्या सहा झाली आहे. पालिका निवडणुकीत पहिल्यांदा बिनविरोध निवडून येण्याचा विक्रम या निवडणुकीत भाजपने आपल्या नावावर नोंदवला आहे.

प्रभाग क्रमांक १८ अ - अश्विनी फुटाणकर, प्रभाग क्रमांक १८ ब - दीपा दीपक मढवी, प्रभाग क्रमांक १८ क - अबूसूद अशफाक अहमद शेख, प्रभाग क्रमांक १६ अ - परेश चौघुले, प्रभाग क्रमांक २३ ब मधून भारती हनुमान चौधरी हे बिनविरोध विजयी झाले आहेत.


अश्विनी फुटाणकर


भारती चौधरी


दीपा मढवी


अबूसूद शेख


परेश चौघुले



काँग्रेस, समाजवादी पक्ष निवडणूक स्वबळावर लढविणार आहेत. भाजप, शिंदेसेनेची युती असून राष्ट्रवादी (शरद पवार), राष्ट्रवादी (अजित पवार) स्वबळावर लढत आहेत.

दै० नवराष्ट्र दि० ०३/०१/२०२६

# भिवंडीत भाजपाची विजयी घोडदौड सुरूच

## आमदार महेश चौघुलेंच्या शिष्टाईनंतर अल्पसंख्यक उमेदवार बिनविरोध झाले विजयी

### भिवंडीत सहा उमेदवार बिनविरोध

**भिवंडी (वा.)** भिवंडी पालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या इतिहासात प्रथमच सहा सदस्य बिनविरोध निवडून येण्याची घटना समोर आली आहे.विशेष म्हणजे हे सहा ही विजयी उमेदवार हे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार असल्याने भिवंडीत भाजपाची विजयी घोटजोड सुरू झाली आहे. ज्यामध्ये एका अल्पसंख्यक मुस्लिम उमेदवाराचा समावेश आहे.
भिवंडी पालिकेत अर्ज माघारी घेण्याच्या पहिल्या दिवशी पद्मानगर येथील प्रभाग क्रमांक १७ मधून माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पुरुषोत्तम पाटील हे विजयी झाले. पण आज शेवटच्या दुसऱ्या दिवशी भिवंडीत आमदार महेश चौघुले यांच्या करिष्म्या ने तब्बल पाच जणांनी बिनविरोध विजय पटकावला. प्रभाग क्रमांक १८ अ - अश्विनी सन्नी फुटाणकर,प्रभाग क्रमांक १८ ब - दीपा दीपक मढवी,प्रभाग क्रमांक १८ क - अबूसूद अशफाक अहमद शेख,प्रभाग क्रमांक १६ अ - परेश ( राजू ) चौघुले,प्रभाग क्रमांक २३ ब - भारती हनुमान चौधरी हे बिनविरोध विजयी झाले.



हा विजय भाजपाच्या विकासाच्या कार्याचा विजय असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शना खाली जनतेला विकास भाजपा पक्षाच्या नेतृत्वाखालीच होऊ शकतो हा विश्वास देण्यात आम्ही यशस्वी झाल्याने मुस्लिम बाहुल्य प्रभाग क्रमांक १८ मध्ये आम्ही तीन उमेदवार बिनविरोध निवडून आणलेa आहेत, अशी प्रतिक्रिया आमदार महेश चौघुले यांनी दिली.

### ताडाळी परिसरातून भारती चौधरी बिनविरोध


- ताडळी परिसरातील प्रतिष्ठेच्या प्रभाग क्रमांक २३ मधून भारतीय जनता पक्षाच्या भारतीय हनुमान चौधरी या बिनविरोध विजय झाल्या आहेत.
- ताडळी येथील प्रभाग क्रमांक २३ चे नेतृत्व करणारे ज्येष्ठ माजी नगरसेवक निलेश चौधरी यांनी केलेल्या शिष्टाईनंतर प्रभाग क्रमांक २३ ब मधील सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतले .आणि त्यानंतर हा विजय शक्य झाला आहे अशी प्रतिक्रिया माजी नगरसेवक हनुमान चौधरी यांनी दिली आहे . यासोबत माजी नगरसेवक नारायण चौधरी,माजी महापौर तुषार चौधरी यांनी मोलाचे सहकार्य केले असल्याची प्रतिक्रिया हनुमान चौधरी यांनी दिले आहे .

Scanned with OKEN Scanner

दै० जागरूक टाइम्स दि० 03/01/2026

# भिवंडी मनपा चुनाव : 30 में से 6 उम्मीदवारों का निर्विरोध निर्वाचन

## राजनीतिक इतिहास में पहली बार दर्ज रिकॉर्ड



भिवंडी। शहर की राजनीति में एक ऐतिहासिक उपलब्धि दर्ज की गई है। महानगरपालिका के भाजपा के कुल 30 उम्मीदवारों में से 6 उम्मीदवारों का निर्विरोध निर्वाचन हुआ है। भिवंडी के राजनीतिक इतिहास में यह पहली बार है जब इतने अधिक वार्डों में बिना किसी मुकाबले के उम्मीदवार चुने गए हैं। इस घटनाक्रम को जनता के भरोसे और भारतीय जनता पार्टी की मजबूत संगठनात्मक शक्ति के रूप में देखा जा रहा है। चुनावी प्रक्रिया के दौरान इन वार्डों में किसी भी विरोधी उम्मीदवार द्वारा नामांकन दाखिल न किए जाने से संबंधित उम्मीदवार स्वतः निर्वाचित घोषित किए गए।

## निर्विरोध निर्वाचित उम्मीदवार

- वार्ड क्रमांक 16 (अ) : चौधुले परेश चंद्रकांत
- वार्ड क्रमांक 17 (ब) : पाटील सुमित पुरुषोत्तम
- वार्ड क्रमांक 23 (ब) : चौधरी भारती हनुमान
- वार्ड क्रमांक 18 (अ) : फूटाणकर अश्विनी सनी
- वार्ड क्रमांक 18 (ब) : मढवी दीपा दीपक फूटाणकर(बाल्या)
- वार्ड क्रमांक 18 (क) : शेख अबुशाह लल्लन

राजनीतिक विश्लेषकों के अनुसार, यह परिणाम आने वाले नगर निगम चुनावों में मतदाताओं के रुझान का स्पष्ट संकेत देता है। साथ ही यह कहा जा रहा है कि यह सफलता संगठनात्मक मजबूती और जनसमर्थन का प्रत्यक्ष प्रमाण है।

दै० खबरें आज तक दि० 03/01/2026

# भिवंडी में भाजपा की विजय दौड़ में छह उम्मीदवार निर्विरोध निर्वाचित

**भिवंडी :** भिवंडी मनपा के आम चुनाव के इतिहास में पहली बार एक साथ छह सदस्य निर्विरोध निर्वाचित होने की घटना सामने आई है। खास बात यह है कि ये सभी निर्विरोध विजेता भारतीय जनता पार्टी के उम्मीदवार हैं।



इनमें एक अल्पसंख्यक मुस्लिम उम्मीदवार का भी शामिल होना राजनीतिक दृष्टि से महत्वपूर्ण माना जा रहा है। इससे भिवंडी में भाजपा की विजयी बढ़त साफ दिखाई दे रही है। उम्मीदवारी अर्ज वापस लेने की प्रक्रिया के पहले दिन पद्मानगर स्थित प्रभाग क्रमांक 17 से पूर्व केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटिल के भतीजे सुमित पुरुषोत्तम पाटील निर्विरोध निर्वाचित हुए थे। इसके बाद अंतिम से एक दिन पहले विधायक महेश चौघुले की प्रभावी शिष्टाचार और पहल से कुल पांच और उम्मीदवारों ने निर्विरोध जीत दर्ज की। निर्विरोध निर्वाचित भाजपा उम्मीदवारों में प्रभाग 18 (अ)अश्विनी सन्नी फुटाणकर, प्रभाग 18 (ब) दीपा दीपक मढवी, प्रभाग 18 (क) अबूसूद अशफाक अहमद शेख, प्रभाग 16 (अ) परेश (राजू) चौघुले, प्रभाग 23 (ब) भारती हनुमान चौधरी शामिल हैं। इस अवसर पर प्रतिक्रिया देते हुए विधायक महेश चौघुले ने कहा कि यह जीत भाजपा के विकास कार्यों पर जनता के विश्वास की जीत है। मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस और प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण के मार्गदर्शन में भाजपा ने यह भरोसा दिलाया है कि शहर का सर्वांगीण विकास केवल भाजपा के नेतृत्व में ही संभव है। इसी विश्वास के चलते मुस्लिम बहुल प्रभाग क्रमांक 18 में भाजपा के तीन उम्मीदवार निर्विरोध चुने गए। उन्होंने आगे कहा कि भिवंडी का अल्पसंख्यक समाज भी राष्ट्रीय एकता की भावना के साथ मिलकर कार्य कर रहा है और भिवंडी से पूरे देश को एक सकारात्मक संदेश जा रहा है जिस पर हमें गर्व है।

ताड़ाली क्षेत्र के प्रतिष्ठित प्रभाग क्रमांक 23 से भाजपा की भारती हनुमान चौधरी निर्विरोध निर्वाचित हुई हैं। ताड़ली प्रभाग के वरिष्ठ पूर्व नगरसेवक निलेश चौधरी द्वारा की गई शिष्टाचार के बाद प्रभाग 23 (ब) के सभी अन्य उम्मीदवारों ने अपने नामांकन वापस ले लिए जिससे यह जीत संभव हो सकी। इस संबंध में प्रतिक्रिया देते हुए पूर्व नगरसेवक हनुमान चौधरी ने बताया कि इस सफलता में पूर्व नगरसेवक नारायण चौधरी और पूर्व महापौर तुषार चौधरी का भी महत्वपूर्ण सहयोग रहा है।

Scanned with OKEN Scanner

दै. ठाणे वैभव दि. ०३/०१/२०२६

# भिवंडीत भाजपचे सहा उमेदवार बिनविरोध विजयी

**ठाणे:** राज्यात भाजप-महायुतीचेच सर्वाधिक उमदेवार बिनविरोध झाले असून एकट्या भाजपचे 35 पेक्षा जास्त उमेदवार बिनविरोध झाले आहेत. त्यामध्ये, ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल आणि भिंवडीत भाजपचे अनेक उमेदवार बिनविरोध झाल्याने भाजप समर्थकांनी विजयी जल्लोष केला आहे. भिवंडी महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आपली ताकद दाखवत सहा उमेदवार बिनविरोध निवडून आणले आहेत. तर, दुसरीकडे शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची युती फिस्कटल्याचेही दिसून आले.

भाजपकडून आज बिनविरोध झालेल्या उमेदवारांमध्ये वार्ड क्रमांक 16-अ मधून परेश चौगुले यांचा समावेश असून ते भाजप आमदार महेश चौगुले यांचे चुलत भाऊ आहेत. तसेच वार्ड क्रमांक 18-ब मधून दीपा मढवी, वार्ड क्रमांक 18-क मधून अबू साद लल्लन, वार्ड क्रमांक 18-अ मधून अश्विनी फुटाणकर आणि वार्ड क्रमांक 23-ब मधून भारती हनुमान चौधरी हे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. याआधी वार्ड क्रमांक 17 मधून केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पाटील यांनी बिनविरोध विजय मिळवला होता. त्यामुळे भिवंडी महानगरपालिका निवडणुकीत भाजपच्या बिनविरोध विजयी उमेदवारांची संख्या आता सहावर पोहोचली आहे.



भिवंडी महापालिका निवडणुकीत भाजपला मिळालेल्या या यशामुळे पक्षाचे स्थान अधिक मजबूत झाले असून आगामी निवडणूक लढतींसाठी भाजपचे मनोबल उंचावल्याचे चित्र दिसत आहे.

### मनसे-शिवेसना युती फिस्कटली

भिवंडी महानगरपालिका निवडणुकीत ठाकरे गटाची शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्यातील युती अखेर फिस्कटली आहे. मनसेसाठी ठरवण्यात आलेल्या दहा जागांपैकी चार वॉर्डांमध्ये ठाकरे शिवसेनेने थेट उमेदवारी अर्ज दाखल केल्याने दोन्ही पक्षांमध्ये तीव्र तणाव निर्माण झाला होता. वार्ड क्रमांक ६-अ, १३-अ, ११-ड आणि १७-ड या प्रभागांमध्ये शिवसेनेने उमेदवार उभे केल्यामुळे मनसेमध्ये मोठी नाराजी पसरली. अर्ज माघारीच्या टप्प्यात दोन्ही बाजूंमध्ये चर्चा झाली असली तरी तोडगा न निघाल्याने मनसेने आपले 10 पैकी 8 उमेदवार अर्ज माघारी घेतले आहे. युतीधर्म पाळला गेला नसल्याचा आरोप मनसेकडून करण्यात येत असून, या प्रकारामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष आहे. वरिष्ठ पातळीवर पुढील भूमिका स्पष्ट होईल. परंतु, स्थानिक पातळीवर ठाकरे सेनेच्या भूमिकेवर मनसेमध्ये मोठी नाराजी आहे.

दै. पुण्यनगरी दि. ०३/०१/२०२६

# भिवंडीत भाजपचे सहा उमेदवार बिनविरोध

**भिवंडी** : महापालिकेच्या निवडणुकीच्या इतिहासात प्रथमच सहा सदस्य बिनविरोध निवडून येण्याची घटना भिवंडीत घडली. विशेष म्हणजे हे सहाही विजयी उमेदवार भाजपचे असल्याने भिवंडीत भाजपची विजयी घोडदौड जोमात सुरू झाली आहे. विजयी उमेदवारांमध्ये एका अल्पसंख्याक मुस्लिम उमेदवाराचा समावेश आहे. भाजपने भिवंडीत जोरदार मुसंडी मारल्याने शिवसेना, काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काही प्रमाणात तणावपूर्ण शांतता पसरली आहे. तर, भाजप कार्यकर्ते जल्लोष व्यक्त करत आहे.

भिवंडी महापालिकेत अर्ज मागारी घेण्याच्या पहिल्या दिवशी पद्मानगर येथील प्रभाग क्रमांक १७ मधून माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे पुतणे सुमित पुरुषोत्तम पाटील हे बिनविरोध विजयी झाल्याचा आनंद साजरा होत असतानाच शुक्रवारी शेवटच्या दिवशी भिवंडीत आमदार महेश चौघुले यांच्या मेहनतीने पाच उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १८ अ - अश्विनी सन्नी फुटाणकर, प्रभाग क्रमांक १८ ब - दीपा दीपक मढवी, प्रभाग क्रमांक १८ क - अबुसूद अशफाक अहमद शेख, प्रभाग क्रमांक १६ अ - परेश (राजू) चौघुले, प्रभाग क्रमांक २३ ब - भारती हनुमान चौधरी हे बिनविरोध विजयी झाले आहेत. भाजपने अनपेक्षितपणे सहा उमेदवार बिनविरोध निवडून आणल्यामुळे शिवसेना, काँग्रेस, समाजवादी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह अन्य पक्षांना मोठी चपराक बसली आहे. हा विजय भाजपच्या विकासाच्या कार्याचा असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील जनतेला विकास भाजप पक्षाच्या नेतृत्वाखालीच होऊ शकतो, हा विश्वास देण्यात आम्ही यशस्वी झाल्याने मुस्लिमबहुल प्रभाग क्रमांक १८ मध्ये आम्ही तीन उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यात यशस्वी झालो आहोत, अशी प्रतिक्रिया आ. महेश चौघुले यांनी दिली.

दै. सकाळ दि. ०३/०१/२०२६

# भिवंडीत सहा बिनविरोध

भिवंडी, ता. २ (वार्ताहर) : महापालिकेच्या इतिहासात प्रथमच सहा सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. विशेष म्हणजे, हे सहा भारतीय जनता पक्षाचे असल्याने भिवंडीत पक्षाची विजयी घोडदौड सुरू झाली आहे. ज्यामध्ये एका अल्पसंख्याक मुस्लिम उमेदवाराचा समावेश आहे.

भिवंडी महापालिकेत पद्मानगर येथील प्रभाग क्रमांक १७ मधून सुमीत पुरुषोत्तम पाटील हे गुरुवारी विजयी झाले. तर शुक्रवारी आमदार महेश चौघुले यांच्या करिष्म्याने पाच जण बिनविरोध निवडून आले. यात प्रभाग क्रमांक १८ अ : अश्विनी सन्नी फुटाणकर, प्रभाग क्रमांक १८ ब : दीपा दीपक मढवी, प्रभाग क्रमांक १८ क : अबूसूद अशफाक अहमद शेख, प्रभाग क्रमांक १६ अ : परेश (राजू) चौघुले, प्रभाग क्रमांक २३ ब : भारती हनुमान चौघरी हे बिनविरोध विजयी झाले आहेत. हा विजय भाजपच्या विकासकार्याचा विजय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील जनतेला विकास भाजप पक्षाच्या नेतृत्वाखालीच होऊ शकतो, हा विश्वास देण्यात आम्ही यशस्वी झालो. मुस्लिमबहुल प्रभाग क्रमांक १८ मध्ये आम्ही तीन उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यात यशस्वी झाल्याचे आमदार महेश चौघुले यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

दै० हमारा महानगर
दि० 03/01/2026

# भिवंडी-निजामपुर मनपा के लिए भाजपा के छह उम्मीदवार निर्विरोध निर्वाचित

**भिवंडी।** भारतीय जनता पार्टी (भाजपा) ने शुक्रवार को दावा किया कि महाराष्ट्र के ठाणे जिले में भिवंडी-निजामपुर नगर निगम (बीएनएमसी) चुनावों के लिए नामांकन पत्रों की जांच के बाद छह भाजपा उम्मीदवार निर्विरोध निर्वाचित हुए हैं। भाजपा की भिवंडी स्थानीय निकाय के प्रमुख हर्षल पाटिल ने दावा किया कि 15 जनवरी को होने वाले चुनावों के लिए नामांकन पत्रों की जांच और वापसी के बाद उम्मीदवार परेश चंद्रकांत चौगुले, सुमित पुरुषोत्तम पाटिल, अश्विनी सनी फुटंकर, दीपा दीपक माधवी, अबुशाह लल्लन शेख और भारती हनुमान चौधरी को निर्विरोध निर्वाचित घोषित किया गया। पड़ोसी कल्याण-डोम्बिवली नगर निगम (केडीएमसी) में भी इसी तरह के रुझान सामने आए हैं, जहां महायुति गठबंधन ने बिना किसी मुकाबले के कई सीटें हासिल कर ली हैं। इन नतीजों के साथ भाजपा ने भिवंडी नगर निगम चुनाव में आधिकारिक तौर पर अपना खाता खोल दिया है और विपक्ष के खिलाफ खुद को मजबूत स्थिति में खड़ा कर लिया है। निर्वाचित उम्मीदवारों के लिए औपचारिक चुनाव प्रमाण पत्र निर्धारित मतदान दिवस पर निर्वाचन अधिकारियों द्वारा जारी किए जाएंगे।

दै० नवभारत टाइम्स दि० 03/01/2026

# भिवंडी: BJP के छह का निर्विरोध जीतना तय

**NBT न्यूज, भिवंडी :** भिवंडी-निजामपुर मनपा के चुनावी इतिहास में पहली बार छह नगरसेवक निर्विरोध चुने जाने वाले हैं। ये सभी छह उम्मीदवार बीजेपी के हैं। इन विजेताओं में एक मुस्लिम उम्मीदवार भी शामिल है। निर्विरोध चुने गए उम्मीदवारों में प्रभाग 17 ब से सुमित पाटील, प्रभाग 18 अ से अश्विनी फुटाणकर, प्रभाग 18 ब से दीपा मढवी, प्रभाग 18 क से अबूसूद अहमद शेख (अल्पसंख्यक उम्मीदवार), प्रभाग 16 अ से परेश (राजू) चौधुले एवं प्रभाग 23 ब से भारती चौधरी शामिल है। बीजेपी की इस सफलता पर विधायक महेश चौघुले ने कहा कि यह जीत बीजेपी के विकास कार्यों की जीत है।

**पनवेल में भी 6 उम्मीदवारों के सामने कोई नहीं:** पनवेल में महायुति ने बड़ी बढ़त हासिल करते हुए छह सीटों पर निर्विरोध जीत दर्ज की है। शुक्रवार को नामांकन पत्र वापस लेने का अंतिम दिन था। इस दौरान महायुति दलों को छोड़ अन्य बड़े दलों के उम्मीदवारों ने अपने नाम वापस ले लिए, जिसके चलते महायुति उम्मीदवारों का जीतना तय है।

Scanned with OKEN Scanner

दै० सकाळ दि० ०३/०१/२०२६

# ‘माघारी’ला अभूतपूर्व राडा

## अपक्षांवर दबाव, मारहाणीचे प्रकार; सोलापुरात खून

**महापालिका निवडणूक**

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. २ : महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या आज शेवटच्या दिवशी राज्यात अभूतपूर्व गोंधळ पाहायला मिळाला. अनेक ठिकाणी माघारीसाठी उमेदवारांवर दबाव टाकण्यात आला तर काही ठिकाणी मारहाणीचे प्रकार घडले. आपल्या उमेदवाराने माघार घेऊ नये म्हणून त्याला कार्यकर्त्यांनीच घरात डांबले. काहींनी दबावापोटी माघार घेतल्यानंतर कार्यकर्त्यांनीच त्यांना शिवीगाळ केली. सोलापूरमध्ये तर भाजपच्याच दोन गटांमध्ये उमेदवारी अर्ज मागे घेण्यावरून झालेल्या वादात मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी असलेल्या बाळासाहेब सरवदे यांचा खून झाला.

या वादात भाजप नेते शंकर शिंदे यांचे कार्यालय देखील फोडण्यात आले. विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी अर्ज मागे घेण्यासाठी धमकावल्याचा आरोप माजी खा. हरिभाऊ » पान ४ वर



नाशिक : उमेदवारी मागे घेऊ नये म्हणून अपक्षाला शुक्रवारी रोखताना कार्यकर्ते.

## ठाणे जिल्ह्यात बिनविरोध जोरात

सकाळ वृत्तसेवा

ठाणे, ता. २ : ठाणे जिल्ह्यातील महापालिकांत बिनविरोध विजयी उमेदवारांचा धडाका अर्ज माघारीच्या दिवशीही कायम राहिला. शुक्रवारी (ता. २) ३० उमेदवार न लढताच विजयी झाले. ठाणे महापालिकेत सात, कल्याण-डोंबिवलीत ११, भिवंडीत पाच आणि पनवेलमध्ये सात उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. बिनविरोध उमेदवारांत महायुतीचा दबदबा राहिला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात शिवसेना शिंदे गटाचे सात उमेदवार बिनविरोध निवडून » पान ४ वर

**विजयी उमेदवार संख्या**

| | |
|---|---|
| कल्याण-डोंबिवली | ११ |
| ठाणे | ७ |
| भिवंडी | ५ |
| पनवेल | ७ |

सरकारनामा : ४,८,९

**भाजपची सरशी**

१ विशेष म्हणजे महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान होणार असले तरी काही ठिकाणी विरोधातील सर्व उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने ६९ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.

२ आठ महापालिकांमध्ये भाजपचे ४४, शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) २२, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) २, मालेगाव महापालिकेत इस्लाम पार्टीचा एक उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे.

३ कल्याण डोंबिवली, ठाणे, नागपूर, जळगाव, पुणे, पिंपरी चिंचवड, पनवेल, भिवंडी, धुळे, अहिल्यानगर या महापालिकांमध्ये ६९ जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत.

### महामुंबईत ५,४७९ उमेदवार रिंगणात

मुंबई पालिकेच्या २२७ जागांसाठी १७२९ उमेदवार रिंगणात आहेत, तर ठाणे जिल्ह्यातील २९४८, पनवेल २५५ आणि वसईत ५४७ उमेदवार आपले नशीब आजमावणार आहेत.

### रणसंग्राम

| | जागा | माघार | रिंगणात | बिनविरोध |
|---|---|---|---|---|
| मुंबई | २२७ | ४५३ | १,७२९ | |
| ठाणे | १३१ | २६९ | ६४९ | ७ |
| नवी मुंबई | १११ | २६९ | ४९९ | |
| मिरा-भाईदर | ९५ | ११३ | ४३५ | |
| भिवंडी : | ९० | २८७ | ४४३ | ५ |
| वसई-विरार | ११५ | २८६ | ५४७ | |
| उल्हासनगर | ७८ | १८९ | ४३२ | |
| कल्याण-डोंबिवली | १२२ | २०५ | ४९० | २० |
| पनवेल | ७८ | ८८ | २५५ | ७ |

## ठाणे जिल्ह्यात बिनविरोध जोरात

» पान १ वरून

आले आहेत. भिवंडी महापालिकेत आतापर्यंत सहा सदस्य बिनविरोध निवडून आले असून सर्व उमेदवार भारतीय जनता पक्षाचे आहेत. यामध्ये एका अल्पसंख्याक मुस्लिम उमेदवाराचा समावेश आहे. पनवेलमधून सात उमेदवार बिनविरोध निवडून आले असून यात सहा भाजपचे, तर एक अपक्ष उमेदवार आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिकेत महायुतीचे ११ उमेदवार हे बिनविरोध निवडून आले असून भाजपचे नऊ तर शिवसेना शिंदे गटाच्या दोन उमेदवारांच्या गळ्यात विजयाची माळ पडली आहे. आतापर्यंत कल्याण-डोंबिवलीत भाजपचे १४ तर शिवसेना शिंदे गटाचे सहा असे महायुतीचे एकूण २० उमेदवार हे बिनविरोध निवडून आले आहेत.

Scanned with OKEN Scanner

दै० सामना दि० ०२/०१/२०२६

ठाणे, नवी मुंबई, भिवंडी, उल्हासनगर, कल्याण - डोंबिवली, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल महानगरपालिका

# तीन हजार आठशे उमेदवार रिंगणात

## आजपासून प्रचाराचा धुरळा उडणार | तिरंगी, चौरंगी लढतीमुळे मोठी चुरस

ठाणे, दि. २ (प्रतिनिधी) – ठाणे, नवी मुंबई, भिवंडी, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, वसई-विरार आणि पनवेल या महापालिका निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली. अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी १ हजार ३९० उमेदवारांनी माघार घेतल्याने या आठही पालिकांसाठी ३ हजार ८०० उमेदवार रिंगणात आहेत. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांचे चित्र स्पष्ट झाल्यामुळे प्रत्येक पालिकेत तिरंगी, चौरंगी सामना रंगणार आहे. त्यामुळे मोठी चुरस निर्माण झाली आहे. रिंगणात असलेल्या उमेदवारांना आजच चिन्हांचे वाटप झाले. १५ जानेवारी रोजी मतदान असून लगेचच दुसऱ्या दिवशी १६ जानेवारीला मतमोजणी आहे. उमेदवारांच्या हाती प्रचारासाठी जेमतेम १० ते ११ दिवस असल्याने उद्या शनिवारपासून प्रचाराची रणधुमाळी उडणार आहे.

### ८८ उमेदवारांची माघार

**उल्हासनगर :** पालिकेच्या ५२० पैकी ८८ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे ७८ जागांसाठी २० प्रभागांतून ४३२ उमेदवार रिंगणात आहेत. मोठ्या संख्येने अर्ज दाखल झाल्याने सर्वच पक्षांची डोकेदुखी वाढली होती. त्यामुळे आज अर्ज माघारीसाठी सर्वांचीच कसोटी लागली होती.

### ७ उमेदवार बिनविरोध

**पनवेल :** महापालिकेच्या ७८ जागांसाठी ६८९ उमेदवारांनी अर्ज भरले होते. पैकी ४० अर्ज अवैध ठरले. आज अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी ३५४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले तर ७ उमेदवार बिनविरोध निवडून आले. त्यामुळे आता ७१ जागांसाठी २९५ उमेदवार रिंगणात आहेत.

### ठाण्यात ६४९ उमेदवार रिंगणात

**ठाणे :** महापालिका निवडणुकीच्या १३१ जागांसाठी तब्बल ६४९ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. नऊ प्रभाग समितीमधून एकूण १ हजार १०७ अर्ज दाखल झाले होते. यामध्ये एकूण २६९ उमेदवारांनी माघार घेतल्याने शेवटच्या दिवशी ६४९ उमेदवार निवडणूक लढवणार आहेत.

### ८४ जागांसाठी लढत

**भिवंडी :** पालिकेच्या निवडणुकीत अर्ज माघारीनंतर ६ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे आता ८४ जागांसाठी ४४३ उमेदवार रिंगणात आहेत.

| पालिका | प्रभाग | नगरसेवक | उमेदवार | बिनविरोध |
|---|---|---|---|---|
| ठाणे | ३३ | १३१ | ६४९ | ०७ |
| नवी मुंबई | २८ | १११ | ४९९ | ०० |
| भिवंडी | २३ | ९० | ४४३ | ०६ |
| उल्हासनगर | २० | ७८ | ४३२ | ०० |
| कल्याण-डोंबिवली | ३३ | १२२ | ४९० | २० |
| मीरा-भाईंदर | २४ | ९५ | ४३५ | ०० |
| वसई-विरार | २९ | ११५ | ५५७ | ०० |
| पनवेल | २० | ७८ | २९५ | ०७ |

### ११७ अर्ज बाद

**नवी मुंबई :** महापालिकेच्या निवडणूक लढवण्यासाठी इच्छुकांनी सुमारे २ हजार ७०० अर्ज खरेदी केले होते. त्यापैकी ९५६ उमेदवारी अर्ज भरण्यात आले. या अर्जांची छाननी झाल्यानंतर ११७ उमेदवारी अर्ज बाद झाले.

### वसई-विरारमध्ये शिवसेनेचे २७ प्रभागांत ९१ उमेदवार

**वसई-विरार :** महानगरपालिकेसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) स्वबळावर लढणार आहे. ११५ पैकी ९१ जागांवर शिवसैनिक लढत आहेत. महिला उमेदवार ३९ व पुरुष उमेदवार ५२ असे एकूण ९१ उमेदवार रिंगणात आहेत.

### मीरा-भाईंदरमध्ये शिवसेना-मनसे युती

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे युती झाली आहे. ९५ पैकी ६७ जागांवर युतीचे उमेदवार रिंगणात आहेत. शिवसेना ५६ जागांवर आणि मनसे ११ जागांवर लढत असून युतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे.

### कल्याण ग्रामीणमध्ये भाजप-शिंदे गट युतीचा फज्जा

**डोंबिवली :** केडीएमसी निवडणुकीत भाजप शिंदे गटाने युती झाल्याचे जाहीर केले असले तरी कल्याण ग्रामीण प्रभाग क्रमांक २९ मध्ये युतीचा फज्जा उडाला आहे. या प्रभागात शिंदे गटातर्फे रुपाली म्हात्रे, रंजना पाटील, नितीन पाटील आणि रवींद्र पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे, तर त्यांच्या विरोधात भाजपतर्फे कविता म्हात्रे, आर्या नाटेकर, अलका म्हात्रे आणि मंदार टावरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. भाजप आणि शिंदे गटाने सर्वच उमेदवारांना एबी फॉर्म दिल्याने महायुतीचेच उमेदवार एकमेकांसमोर उभे ठाकल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.

Scanned with OKEN Scanner

दै. पुढारी दि. ०३/०१/२०२६

# भिवंडीत ४४३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात, २८७ जणांची माघार

**भिवंडी :** भिवंडी पालिकेच्या चुरशीच्या होत असलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत २८७ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर, आता निवडणुकीच्या रिंगणात ४४३ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. पालिका निवडणुकीत १०३३ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. अर्ज छाननीमध्ये ७४ उमेदवारी अर्ज बाद झाले आहेत. त्यानंतर अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत २८७ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले.तर २२९ उमेदवारांचे दुबार अर्ज होते. ते वगळता आता निवडणुकीच्या रिंगणात ४४३ उमेदवार शिल्लक राहिले आहेत.

Scanned with OKEN Scanner

दै० नवभारत टाइम्स
दि० 03/01/2026

# भिवंडी: घर-घर जाकर डबल वोटर्स के भरे जाएंगे 'परिशिष्ट-1'

■ NBT न्यूज, भिवंडी : भिवंडी मनपा क्षेत्र की मतदाता सूची के भाग में दर्ज दोहरे मतदाताओं के घर-घर जाकर उनका 'परिशिष्ट-1' भरने के आदेश सभी सुपरवाइजर एवं सभी मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बीएलओ) को दिया गया है। मनपा के सहायक आयुक्त तथा अतिरिक्त मतदाता पंजीकरण अधिकारी द्वारा यह आदेश मनपा आयुक्त तथा मुख्य चुनाव अधिकारी अनमोल सागर के निर्देश पर दिया गया है। उक्त कार्य पूरा कर 4 जनवरी तक संबंधित कार्यालय में जमा करना आवश्यक है।

**चुनाव अधिकारी ने भिवंडी मनपा क्षेत्र में सक्रिय BLO को जारी किए आदेश**

भिवंडी मनपा क्षेत्र की मतदाता सूची में दोहरे मतदाताओं के तकरीबन 27 हजार से अधिक नाम दर्ज हैं, जिनके सामने स्टार लगाया गया है। मनपा आयुक्त तथा मुख्य चुनाव अधिकारी अनमोल सागर के निर्देश पर नपा के सहायक आयुक्त तथा अतिरिक्त मतदाता पंजीकरण अधिकारी द्वारा मतदाता सूची में दर्जदोहरे मतदाताओं के घर-घर जाकर उनका परिशिष्ट-एक भरने का आदेश दिया गया है।

सहायक आयुक्त तथा अतिरिक्त मतदाता पंजीकरण अधिकारी द्वारा सभी सुपरवाइजर एवं बीएलओ को दिए गए आदेश में कहा गया है कि यह कार्य चुनाव से संबंधित है और समय सीमा के भीतर पूरा किया जाना है। मतदाता सूची के भाग में दर्ज दोहरे मतदाताओं के घर-घर जाकर उनका 'परिशिष्ट-1' भरने का काम तत्काल प्राथमिकता से किया जाना चाहिए। परिशिष्ट-एक भरने के बाद संबंधित मतदाता उसे आवंटित किए गए मतदान केंद्र के अलावा किसी अन्य मतदान केंद्र पर मतदान नहीं कर सकेगा। मतदाता को इस बात से अवगत कराया जाए कि यदि वह उक्त नियमों का उल्लंघन करता है, तो संबंधित स्थानीय निकाय के प्रावधानों के अनुसार वह दंड का पात्र होगा। सुपरवाइजर एवं बीएलओ को संपूर्ण सूची के दोहरे मतदाताओं का 'परिशिष्ट-1' भराकर लिखित रिपोर्ट 4 जनवरी को दोपहर 3 बजे तक संबंधित कार्यालय में पेश करना होगा।

Scanned with OKEN Scanner